मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# शेकडो नाट्यरसिकांनी घेतली मतदानाची शपथ

## सुप्रसिद्ध अभिनेते प्रशांत दामले, अभिनेत्री कविता लाड मेढेकर यांची प्रमुख उपस्थिती



**पिंपरी | प्रतिनीधी**

कलाकारांच्या शब्दांतून आणि रसिकांच्या सहभागातून मतदानाचे महत्त्व अधोरेखित करीत, लोकशाहीचा मूलमंत्र नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने पिंपळे गुरव येथील नटसम्राट निळू फुले नाट्यगृह येथे मतदान जनजागृती उपक्रम पार पडला. कला, संस्कृती आणि लोकशाही यांचा सुरेल संगम साधत, रंगमंचाच्या माध्यमातून दिलेला मतदानाचा संदेश नागरिकांच्या मनात रुजवण्यासाठी हा उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमात सुप्रसिद्ध अभिनेते प्रशांत दामले आणि अभिनेत्री कविता मेढेकर यांनी देखील सहभागी होत आगामी महापालिका निवडणुकीत मतदान करण्याचे नागरिकांना आवाहन केले.

पिंपरी चिंचवड महापालिकेची निवडणूक जाहीर झाली असून, या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली व अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त अण्णा बोदडे यांच्या अधिपत्याखाली राबविण्यात येत असलेल्या स्वीप कार्यक्रमांतर्गत पिंपळे गुरव येथील नटसम्राट निळू फुले नाट्यगृह येथे ‘एका लग्नाची पुढची गोष्ट...’ या नाट्यप्रयोगाच्या वेळी मतदान जनजागृती उपक्रम राबवण्यात आला.

या उपक्रमाच्या निमित्ताने रंगमंचावर केवळ मनोरंजनच नव्हे, तर लोकशाहीची जबाबदारीही अधोरेखित करण्यात आली. अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमामध्ये शेकडो नाट्यरसिकांनी मतदानाची शपथ घेत लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेण्याचा संकल्प व्यक्त केला. नाट्यप्रयोगासारख्या लोकप्रिय माध्यमातून मतदानाचा संदेश पोहोचविल्यामुळे नागरिकांमध्ये सकारात्मक संवाद निर्माण झाला असून, येणाऱ्या निवडणुकीत अधिकाधिक मतदारांनी मतदानाचा हक्क बजावावा, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

> पिंपरी चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीत येत्या १५ जानेवारीला आपला मतदानाचा हक्क नक्की बजावा. सर्वात प्रथम मतदान करा, कारण लोकशाही सशक्त करण्यासाठी ते अत्यंत गरजेचे आहे.
>
> **- कविता लाड मेढेकर, अभिनेत्री.**

### मतदानाची शपथ..

“आम्ही, भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून, याद्वारे प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करू आणि मुक्त, निःपक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणुकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणुकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करू” अशी शपथ यावेळी उपस्थितांना देण्यात आली. जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी शपथेचे वाचन केले.

> येत्या १५ जानेवारीला पिंपरी चिंचवड महापालिकेची निवडणूक आहे. या दिवशी देण्यात आलेल्या सुट्टीचा उपयोग मतदानासाठीच करा. मतदान हा आपला लोकशाहीतील मूलभूत हक्क आहे. त्यामुळे १५ जानेवारीला सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत नक्की मतदान करा.
>
> **- प्रशांत दामले, अभिनेते.**

> लोकशाही मजबूत करण्यासाठी मतदान हा केवळ अधिकार नसून प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. कला व संस्कृतीच्या माध्यमातून दिलेला मतदानाचा संदेश अधिक प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचतो आणि त्यातून लोकसहभाग वाढतो, ही बाब अत्यंत सकारात्मक आहे.
>
> **- तृप्ती सांडभोर, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.**

---

# आरपीआय (आठवले गट) भाजपासोबत.. कमळ चिन्हावर 5 जागा लढवणार..!

## 128 पैकी पाच जागांवर ‘कमळ’ चिन्हावर उमेदवार; शहराध्यक्ष कुणाल व्हावळकर यांची माहिती

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीसाठी आरपीआय (आठवले गट) भाजपसोबत निवडणुकीला सामोरे जाणार आहे. आरपीआयला पाच जागा भाजपाने सोडल्या आहेत. तसेच हे सर्व उमेदवार ‘कमळ’ या चिन्हावर लढणार आहेत अशी माहिती आरपीआयचे शहराध्यक्ष कुणाल व्हावळकर यांनी दिली आहे.

पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीत १२८ जागांपैकी पाच जागा आरपीआय आठवले गट लढणार आहे. ०१) प्रभाग क्रमांक ९ – कमलेश वाळके, ०२) प्रभाग क्रमांक २५ – कुणाल व्हावळकर, ०३) प्रभाग क्रमांक ३० – चंद्रकांता सोनकांबळे, ०४) प्रभाग क्रमांक २१ – मोनिका निकाळजे, ०५) प्रभाग क्रमांक १६ – धर्मपाल तंतरपाळे हे आरपीआयचे उमेदवार भाजपच्या ‘कमळ’ या चिन्हावर निवडणुकीला सामोरे जाणार आहेत.



# आयुक्त श्रावण हर्डीकर यांची ईव्हीएम स्ट्राँगरूमची पाहणी

## ईव्हीएम मशिन्सच्या सुरक्षितता, साठवणूक व वाहतुकीबाबत अधिकाऱ्यांना कडक सूचना

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५–२६ च्या पार्श्वभूमीवर मतदान प्रक्रिया पारदर्शक, सुरळीत व अडथळाविरहीत पार पडावी, यासाठी महापालिका प्रशासनाकडून जय्यत तयारी सुरू आहे. या अनुषंगाने महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांनी अभिरक्षा कक्ष (STRONGROOM) तसेच निवडणूक साहित्य कक्षाची पाहणी केली.



या पाहणीदरम्यान ईव्हीएम मशिन्सची साठवणूक, सुरक्षितता, वाहतूक व्यवस्था तसेच वापरापूर्वी व वापरानंतरच्या प्रक्रियांची माहिती घेण्यात आली. मतदान केंद्रांपर्यंत ईव्हीएम मशिन्स व संबंधित साहित्य पोहोचवताना तसेच मतदानानंतर ती सुरक्षितरीत्या परत आणताना कोणतीही चूक किंवा निष्काळजीपणा होणार नाही, याची विशेष दक्षता घेण्याच्या सूचना आयुक्त हर्डीकर यांनी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना यावेळी दिल्या.

यावेळी अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, नगर सचिव मुकेश कोळप, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, निवडणूक विभागाचे उप आयुक्त सचिन पवार, कार्यकारी अभियंता सुनील पवार, अभिमान भोसले, संजय काशिद, सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह निवडणूक विभागातील वरिष्ठ अधिकारी, संबंधित शाखांचे प्रमुख तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

मतदानासाठी वापरण्यात येणारी ईव्हीएम यंत्रे व निवडणूक साहित्य महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार बीड व कोल्हापूर जिल्ह्यातील विविध तालुक्यांतून पिंपरी येथे सुरक्षितरीत्या आणण्यात आली आहेत. पिंपरी येथे दाखल झाल्यानंतर सर्व वाहनांच्या सीलबंद स्थितीची खातरजमा करून राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत ईव्हीएम यंत्रे अभिरक्षा कक्षामध्ये सुरक्षितरीत्या ठेवण्यात आली आहेत. या अभिरक्षा कक्षाची पाहणी करताना आयुक्त हर्डीकर यांनी ईव्हीएम मशिन्स हाताळताना निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करणे, मशिन्सच्या सीलिंग, तपासणी व चाचणी प्रक्रियेत पूर्ण पारदर्शकता राखणे, तसेच कोणतीही तांत्रिक अडचण उद्भवल्यास तत्काळ उपाययोजना करण्यासाठी सज्ज राहण्याचे निर्देश दिले.

मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी अधिकारी व कर्मचारी यांच्यात योग्य समन्वय असणे अत्यंत आवश्यक असून प्रत्येकाने आपली जबाबदारी गंभीरतेने व नियमानुसार पार पाडावी, असेही त्यांनी नमूद केले. तसेच निवडणूक साहित्याची योग्य नोंद, साठवणूक व वितरण प्रक्रियेत कोणतीही त्रुटी राहू नये, याबाबतही खबरदारी घेण्याच्या सूचना देखील आयुक्त हर्डीकर यांनी दिल्या.

याशिवाय, निवडणूक प्रक्रियेत सहभागी प्रत्येक अधिकारी व कर्मचारी यांनी नियमांचे पालन करून काम केल्यासच लोकशाहीच्या या महत्त्वपूर्ण प्रक्रियेवरील नागरिकांचा विश्वास अधिक दृढ होईल. तसेच महापालिका प्रशासनाच्या या तयारीमुळे पिंपरी चिंचवड शहरातील सार्वत्रिक निवडणूक २०२५–२६ शांततेत, सुरक्षित व यशस्वीरीत्या पार पडेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# कार्यकर्त्यांच्या प्रेरणेचे केंद्र ठरणाऱ्या 'शक्तिस्थळ'चे 1 जानेवारीला लोकार्पण

## लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या स्मृतींना जिवंत ठेवणारा मौल्यवान ठेवा: आमदार शंकर जगताप

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडच्या इतिहासात एक भावनिक व अभिमानाचा क्षण नोंदवला जाणार आहे. प्रेरणा, निष्ठा, सामर्थ्य, सेवाभाव आणि दातृत्वाचे प्रतीक असलेले लोकनेते आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या स्मरणार्थ उभारण्यात आलेल्या 'शक्तिस्थळ' या प्रेरणा केंद्राचे भव्य लोकार्पण गुरुवार, दि. १ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता पिंपळे गुरव गावठाण येथील मारुती मंदिराजवळ होणार आहे.

आमदार शंकर जगताप याबाबत माहिती देताना म्हणाले, लोकनेते लक्ष्मण भाऊ जगताप यांच्या दातृत्व, कर्तुत्व आणि नेतृत्वाची ख्याती सर्वश्रुत आहे. पिंपरी चिंचवड शहराला अत्याधुनिक शहर बनवण्याचा त्यांचा ध्यास होता. नाविन्यपूर्ण गोष्टी शहरासाठी उपयोगात येतील यावरच त्यांचा नेहमी भर असायचा. लक्ष्मणभाऊंच्या कार्याचा वारसा आणि भावी पिढ्यांना दिशा देणारी प्रेरणा यांचा संगम साधत हे शक्तिस्थळ उभारण्यात आलेले आहे. हे शक्तिस्थळ केवळ स्मारक नसून, सेवाभाव, निष्ठा आणि कर्तव्याची जिवंत शिकवण ठरणार आहे. आयुष्यभर सर्वसामान्य माणसासाठी झटणाऱ्या भाऊंच्या विचारांना येथे कायमस्वरूपी जतन केले जाणार आहे.

'शक्तिस्थळ' लोकार्पण करण्यासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस उपस्थिती राहणार आहेत. केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर अण्णा मोहोळ, राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, माधुरीताई मिसाळ, राज्याचे मंत्री डॉ. प्रा. तानाजीराव सावंत, माजी आमदार श्रीमती अश्विनीताई लक्ष्मणभाऊ जगताप, पुणे महानगरपालिकेचे माजी नगरसेवक विजयजी रेणुसे तसेच विजय पांडुरंग जगताप यांची उपस्थिती कार्यक्रमाला लाभणार आहे. लोकनेते आमदार लक्ष्मणभाऊ जगताप मित्र परिवार




> पिंपरी चिंचवड शहराने स्वतःचे वेगळे अस्तित्व निर्माण करावे. अत्याधुनिक शहरांच्या यादीमध्ये सर्वात वरचे स्थान मिळवावे, यासाठी लोकनेते लक्ष्मण भाऊ जगताप यांचा नेहमीच पुढाकार असायचा. अत्याधुनिक सेवा, वाहतुकीचे नियोजन, पाण्याची मुबलकता, शिक्षणाच्या आणि आरोग्याच्या उत्तम सुविधा हेच "व्हिजन" नेहमी लक्ष्मणभाऊंनी ठेवले होते . आज तेच "व्हिजन" शक्तिस्थळाच्या रूपात आमच्या समोर आहे . हे आम्हाला वेळोवेळी भाऊंनी दाखवलेल्या मार्गावरून जाण्यासाठी प्रेरित करेल. आम्हा कार्यकर्त्यांचे ते शक्तिचे केंद्र ठरेल. संघर्षाच्या वाटेवर चालण्यासाठी या केंद्रातून आम्हाला नेहमीच भाऊंच्या प्रेरणेतून शक्ती मिळेल. हे 'शक्तिस्थळ" लक्ष्मण भाऊंच्या आठवणींचे, संस्कारांचे आणि निष्ठेचे चिरंतन प्रतीक ठरणार आहे.
>
> **- शंकर जगताप, चिंचवड विधानसभा, निवडणूक प्रमुख पिं.चिं.शहर**

यांच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

**असे असेल शक्तिस्थळ**

15 गुंठे जागेमध्ये हे शक्तिस्थळ उभारण्यात आले आहे. यामध्ये लोकनेते लक्ष्मण भाऊ जगताप यांच्या आठवणींचे जतन केले गेले आहे. त्यांना मिळालेले अनेक पुरस्कार, सन्मान चिन्ह या ठिकाणी कार्यकर्त्यांना प्रेरणा मिळावी या उद्देशाने संग्रहित करण्यात आले आहे . शक्तिस्थळामध्ये ग्रंथालय, अभ्यासिका, ॲम्फी थिएटर यांचा समावेश आहे. अभ्यासिकेच्या माध्यमातून युवकांना यूपीएससी आणि एमपीएससीच्या अभ्यासासाठी मदत होणार आहे. या ठिकाणी चौथरा उभारण्यात आला आहे. तेथे अखंड ज्योत प्रज्वलित राहणार आहे. वेगवेगळ्या प्रकारच्या वृक्षांचे रोपण देखील या ठिकाणी करण्यात आलेले आहे.

# दिवंगत आमदार, खासदारांसह या माजी मंत्र्यांच्या पुढच्या पिढीला उमेदवारी !

## मुंबई पाठोपाठ राज्यात सर्वात मोठी महापालिका असलेल्या पुणे महापालिकेत भाजपला एकहाती सत्ता मिळावी, यासाठी नियोजन केले जात आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

केंद्रात आणि राज्यात सत्ताधारी असलेल्या भारतीय जनता पक्षाने पुणे महापालिकेच्या निवडणुकीत अधिकाधिक जागा मिळवून एकहाती सत्ता मिळविण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. यासाठी आवश्यक ते नियोजन केले जात आहे. भाजपच्या माजी जुन्या पदाधिकाऱ्यांसह नवीन पिढीचे नेतृत्व करणाऱ्या तरुणाईला संधी देण्याचा निर्णय पक्षाने घेतला आहे.

मुंबई पाठोपाठ राज्यात सर्वात मोठी महापालिका असलेल्या पुणे महापालिकेत भाजपला एकहाती सत्ता मिळावी, यासाठी नियोजन केले जात आहे. राज्यात महायुतीत मित्र पक्ष म्हणून सहभागी असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यांच्या बरोबर महायुतीत निवडणूक न लढविता त्यांचा विरोधात निवडणुकीत निवडणूक लढविण्याची भूमिका भाजपने जाहीर केली आहे.

महापालिकेच्या सभागृहात जुन्या पदाधिकाऱ्यांबरोबरच नवीन चेहरे दिसावेत यासाठी तरुण पिढीला संधी देण्याची भूमिका घेण्यात आली आहे. पक्षाचे दिवंगत आमदार, खासदारांचा मुलगा, सून यांच्यासह इतर पक्षांतून भाजपमध्ये प्रवेश केलेल्या दोन आमदारांच्या मुलांना भाजपने महापालिकेची उमेदवारी जाहीर केली आहे. पक्षातील विश्वसनीय सूत्रांनी ही माहिती दिली. यामध्ये कसबा विधानसभा मतदारसंघाच्या दिवंगत आमदार मुक्ता टिळक यांचे सुपुत्र कुणाल टिळक, खासदार गिरीश बापट यांच्या सुनबाई स्वरदा बापट, खडकवासल्याचे दिवंगत आमदार रमेश वांजळे यांची मुलगी सायली वांजळे, माजी मंत्री शशिकांत सुतार यांचे सुपुत्र पृथ्वीराज सुतार यांना उमेदवारी जाहीर केली.




### उमेदवाराला दूरध्वनी करून थेट एबी अर्ज

» महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारांची यादी जाहीर केल्यास मोठ्या प्रमाणात बंडखोरी तसेच तिकीट न मिळाल्याने कार्यकर्त्यांमध्ये नाराजी पसरू शकते, या भीतीने भारतीय जनता पक्षाने उमेदवारांची यादी जाहीर न करता प्रत्येक उमेदवाराला दूरध्वनी करून थेट एबी अर्ज दिले.

महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारांची यादी जाहीर केल्यास मोठ्या प्रमाणात बंडखोरी तसेच तिकीट न मिळाल्याने कार्यकर्त्यांमध्ये नाराजी पसरू शकते, या भीतीने भारतीय जनता पक्षाने उमेदवारांची यादी जाहीर न करता प्रत्येक उमेदवाराला दूरध्वनी करून थेट एबी अर्ज दिले. यामध्ये कसबा विधानसभा मतदारसंघाच्या दिवंगत आमदार मुक्ता टिळक यांचा मुलगा कुणाल टिळक, खासदार बापट आणि माजी मंत्री गिरीश बापट यांच्या सूनबाई स्वरदा बापट यांच्या नावाचा समावेश आहे. पक्षाने दाखविलेल्या विश्वासाबद्दल टिळक यांनी पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांसह शहरातील पदाधिकाऱ्यांचे समाजमाध्यमावर आभार मानले आहेत.

पक्षाची नवीन पिढी राजकारणात यावी यासाठी भाजपच्या काही माजी पाधिकाऱ्यांच्या घरातील व्यक्तींना या निवडणुकीत संधी देण्यात आली आहे. शिवाजीनगर मतदारसंघातील माजी नगरसेविका प्रा. ज्योत्स्ना एकबोटे यांची मुलगी प्रा. निवेदिता एकबोटे, निलिमा खाडे यांचे सुपुत्र अपूर्व खाडे यांच्यासह निष्ठावंत पदाधिकाऱ्यांच्या पुढच्या पिढीतील व्यक्तींना भाजपने पक्षाची उमेदवारी जाहीर केली आहे.

### भाजपचे माजी पदाधिकारी रिंगणात

» माजी सभागृहनेते गणेश बीडकर, श्रीनाथ भिमाले, माजी स्थायी समिती अध्यक्ष योगेश मुळीक, शहराध्यक्ष धीरज घाटे, माजी नगरसेविका मंजुषा नागपुरे, प्रसन्न जगताप, श्रीकांत जगताप यांच्यासह महेश वाबळे, रेश्मा भोसले, हरिदास चरवड, राजाभाऊ लायगुडे यांना उमेदवारी जाहीर केल्याची माहिती सूत्रांनी दिली.

### नवीन पिढी राजकारणात

» पक्षाची नवीन पिढी राजकारणात यावी यासाठी भाजपच्या काही माजी पाधिकाऱ्यांच्या घरातील व्यक्तींना या निवडणुकीत संधी देण्यात आली आहे. शिवाजीनगर मतदारसंघातील माजी नगरसेविका प्रा. ज्योत्स्ना एकबोटे यांची मुलगी प्रा. निवेदिता एकबोटे, निलिमा खाडे यांचे सुपुत्र अपूर्व खाडे यांच्यासह निष्ठावंत पदाधिकाऱ्यांच्या पुढच्या पिढीतील व्यक्तींना भाजपने पक्षाची उमेदवारी जाहीर केली आहे.

# पुणे विमानतळावर पार्किंग बे वाढणार; हवाई दलाकडून 13 एकर जागा देण्याची तयारी

## विमानांची संख्या 15 पर्यंत वाढणार, प्रवास अधिक वेगवान आणि कनेक्टिव्हिटीला चालना

**पुणे | प्रतिनिधी**

भारतीय वायुसेनेने पुणे विमानतळ प्रशासनाला 13 एकर जागा देण्याची तयारी दाखवली असून, ही जागा येत्या महिनाभरात पुणे विमानतळ प्रशासनाला मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे येथील 5 पार्किंग बे (विमाने उभी करण्याची जागा) वाढणार आहेत. सध्या पुणे विमानतळावर 10 पार्किंग बे आहेत. पाच वाढल्यामुळे येथे 15 पार्किंग बे होतील, परिणामी, विमानप्रवास वेगवान होणार आहे.

येत्या महिनाभरात या जागेचा ताबा विमानतळ प्रशासनाला मिळण्याची शक्यता आहे. या जागेमुळे विमानतळाच्या परिचालन क्षमतेत मोठी वाढ होणार आहे. विमाने उभी करण्यासाठी नव्या पार्किंगसाठी जागा उपलब्ध होतील. यामुळे आगामी काळात विमानांना हवेत घिरट्या घालाव्या लागणार नाहीत, पर्यायाने इंधन आणि वेळ वाचणार आहे. पार्किंगची सुविधा वाढल्याने भविष्यात पुण्यातून अधिक नवीन शहरे जोडली जाऊ शकणार आहेत.



विमानांचे आगमन आणि उड्डाण वेळेवर झाल्यामुळे टर्मिनलमधील प्रवाशांची गर्दी कमी होण्यास मदत होणार आहे. गेल्या अनेक दिवसांपासून पुणे विमानतळावर विमानांची संख्या वाढत होती. मात्र, पार्किंगसाठी पुरेशी जागा असल्यामुळे विमान कंपन्यांना मर्यादा येत होत्या. हवाई दलाने दर्शवलेल्या या सकारात्मक निर्णयामुळे पुण्याच्या हवाई कनेक्टिव्हिटीला मोठी चालना मिळणार आहे.

या १३ एकर जमिनीचा वापर विमानतळावर पाच नवीन विमान पार्किंग बे आणि तीन दुर्गम बे (REMOTE BAYS) तयार करण्यासाठी केला जाणार आहे.

सद्यस्थितीत पुणे विमानतळावर विमानांची संख्या आणि उड्डाणांची मागणी सतत वाढत आहे, परंतु पार्किंगची कमतरता ही मोठी अडचण ठरत होती. नवीन बे उपलब्ध झाल्यामुळे विमानांना पार्किंगसाठी प्रतीक्षा करावी लागणार नाही, जे वेळेचा अपव्यय आणि उड्डाणांतील विलंब कमी करेल.

### हवाई कनेक्टिव्हिटीला चालना

» गेल्या अनेक दिवसांपासून पुणे विमानतळावर विमानांची संख्या वाढत होती. मात्र, पार्किंगसाठी पुरेशी जागा असल्यामुळे विमान कंपन्यांना मर्यादा येत होत्या. हवाई दलाने दर्शवलेल्या या सकारात्मक निर्णयामुळे पुण्याच्या हवाई कनेक्टिव्हिटीला मोठी चालना मिळणार आहे.

# होम मिनिस्टर, जागरण-गोंधळाद्वारे इच्छुकांचे शक्तिप्रदर्शन

## टाकळी हाजी गटात 'बाहेरचे' उमेदवारही सक्रिय; जिल्हा परिषदेसाठी राजकीय मोर्चेबांधणी जोरात, धार्मिक कार्यक्रमांच्या आडून मतांचा जोगवा.

**पुणे | प्रतिनिधी**

तालुक्यातील बेट भागात आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापले आहे. आचारसंहिता लागू होण्यास अद्याप अवधी असला तरी, इच्छुक उमेदवारांनी प्रत्यक्ष प्रचारापूर्वीच धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून आपली ताकद दाखवण्यास सुरुवात केली आहे.

सध्या या भागात होम मिनिस्टर, देवदर्शन, भव्य जागरण-गोंधळ आणि सामूहिक जेवनावळींची जंत्री सुरू असून, त्या आडून राजकीय गणिते जुळवली जात असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.टाकळी हाजी जिल्हा परिषद गट सध्या खुल्या प्रवर्गासाठी असल्याने या ठिकाणी गटाबाहेरील आणि शेजारील आंबेगाव तालुक्यातील उमेदवारांनीही चाचपणी सुरू केली आहे.

काही इच्छुकांनी आता नाही तर कधीच नाही, असा पवित्रा घेत गेल्या अनेक दिवसांपासून जनसंपर्क वाढवला आहे.



### अनेकांचा नशीब आजमावण्याची धडपड

» पंचायत समिती गटामध्येही अनेक नवीन चेहरे आपले नशीब आजमावण्यासाठी पुढे सरसावले आहेत. या अनोख्या शक्तिप्रदर्शनाच्या लढाईत मतदार कोणाला कौल देतात आणि कोणाचा राजकीय गोंधळ उडतो, हे पाहणे आता औत्सुक्याचे ठरणार आहे.

### आचारसंहीतेला बगल देत नियोजन

» प्रशासकीय निर्बंध येण्यापूर्वीच हे सर्व कार्यक्रम जाणीवपूर्वक आखले जात असून, त्याद्वारे मतदारांना प्रलोभने दिली जात असल्याचे जागरूक नागरिकांचे म्हणणे आहे. या कार्यक्रमांना जमणारी गर्दी आणि तिथे उपस्थित राहणारे राजकीय नेते यांच्यावरून आगामी निवडणुकीची दिशा ठरणार आहे.

### इच्छुकांचे शक्तिप्रदर्शन

» या कार्यक्रमाला महिलांची झालेली मोठी गर्दी राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरली आहे. याच पावलावर पाऊल टाकत आता दुसऱ्या एका इच्छुकाने टाकळी हाजी येथे शुक्रवारी (दि. २ जानेवारी) भव्य जागरण-गोंधळ आणि महाप्रसादाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणावर लोकांना एकत्र करून शक्ती दाखवण्याची खेळी खेळली जात असल्याची चर्चा बेट भागात रंगली आहे.

दुसरीकडे घराणेशाहीला शह देण्यासाठी विरोधकांनी एकत्र येत मोट बांधण्याचे काम सुरू केले आहे. मात्र, अद्याप कोणत्याही मोठ्या राजकीय पक्षाने अधिकृत उमेदवारी जाहीर न केल्याने इच्छुकां समोर पेच निर्माण झाला असला तरी, त्यांचा वैयक्तिक प्रचार मात्र जोरात सुरू आहे.

विशेष म्हणजे दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र आल्यास ऐनवेळी पक्षांतराचा पर्याय देखील काहींनी खुला ठेवल्याचे खाजगीत सांगितले जात आहे.तरूण मतदारांना आकर्षित करण्यासाठी अनेक ठिकाणी क्रिकेट स्पर्धांचे आयोजन केले जात आहे. नुकतेच कवठे येमाई येथे जिल्हा परिषद आणि पंचायत समितीसाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांनी संयुक्तपणे होम मिनिस्टर कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

त्याद्वारे मतदारांना प्रलोभने दिली जात असल्याचे जागरूक नागरिकांचे म्हणणे आहे. या अनोख्या शक्तिप्रदर्शनाच्या लढाईत मतदार कोणाला कौल देतात आणि कोणाचा राजकीय गोंधळ उडतो, हे पाहणे आता औत्सुक्याचे ठरणार आहे. या कार्यक्रमांना जमणारी गर्दी आणि तिथे उपस्थित राहणारे राजकीय नेते यांच्यावरून आगामी निवडणुकीची दिशा ठरणार आहे. या कार्यक्रमाला महिलांची झालेली मोठी गर्दी राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरली आहे. याच पावलावर पाऊल टाकत आता दुसऱ्या एका इच्छुकाने टाकळी हाजी येथे शुक्रवारी (दि. २ जानेवारी) भव्य जागरण-गोंधळ आणि महाप्रसादाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणावर लोकांना एकत्र करून शक्ती दाखवण्याची खेळी खेळली जात असल्याची चर्चा बेट भागात रंगली आहे.

# गावाच्या मध्यातून राष्ट्रीय महामार्ग; तळेगावकरांचा विरोध, शाळा-मंदिरांना धोका

## तळेगाव ढमढेरेत महामार्गावरून संघर्षाची ठिणगी! लोकवस्तीतून जाणाऱ्या NH 548-D ला ग्रामस्थांचा प्रखर विरोध, प्रशासकीय मनमानीवर संताप.

**पुणे | प्रतिनिधी**

ग्रामस्थांना आपल्या गावाच्या अस्तित्वासाठी आणि सुरक्षिततेसाठी पुन्हा एकदा शासनदरबारी संघर्षाचे पाऊल उचलावे लागत आहे. गावाच्या मध्यभागातून जात असलेल्या राष्ट्रीय महामार्ग ५४८-डीच्या रुंदीकरणामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, प्रशासनाच्या मनमानी कारभाराविरोधात गावात तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

गावाच्या ज्या भागातून हा महामार्ग जात आहे, तिथे घनदाट लोकवस्तीसह आठवडे बाजार, शाळा, महाविद्यालये, प्राथमिक आरोग्य केंद्र, बँका आणि मंदिरे आहेत. या मुख्य रस्त्यावरून अवजड वाहतूक सुरू झाल्यास विद्यार्थी, वृद्ध आणि सर्वसामान्य नागरिकांच्या जीविताला मोठा धोका निर्माण होऊन अपघातांचे प्रमाण वाढण्याची भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.



### पर्यायी मार्ग न दिल्यास संघर्ष अटळ

» पूर्वी या महामार्गासाठी गावाबाहेरून बायपास मार्ग प्रस्तावित होता, मात्र प्रशासनाने तो बदलून थेट लोकवस्तीतून महामार्ग आखल्याने प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत. गावाच्या मध्यभागातून महामार्ग न नेता पर्यायी मार्ग द्यावा किंवा उड्डाणपुलाची व्यवस्था करावी, अशी ग्रामस्थांची ठाम मागणी आहे. जर प्रशासनाने या मागणीची दखल न घेता लोकांचे जीवन धोक्यात टाकले, तर हा संघर्ष अधिक तीव्र करण्याचा इशारा तळेगावकरांनी दिला आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने रस्ता आराखडा तयार करताना स्थानिक प्रशासन किंवा नागरिकांना विश्वासात घेतले नाही. रस्ता रुंदीकरणाचे काम करताना संबंधित भोगवटादारांना कोणतीही पूर्वसूचना किंवा नोटीस न देता मनमानी पद्धतीने काम सुरू करण्यात आले आहे. कंत्राटदाराकडे रस्ता आराखड्याची मागणी केली असता टाळाटाळ केली जात असल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे.

ग्रामस्थांना आपल्या गावाच्या अस्तित्वासाठी आणि सुरक्षिततेसाठी पुन्हा एकदा शासनदरबारी संघर्षाचे पाऊल उचलावे लागत आहे. गावाच्या मध्यभागातून जात असलेल्या राष्ट्रीय महामार्ग ५४८-डीच्या रुंदीकरणामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला गावाच्या मध्यभागातून महामार्ग न नेता पर्यायी मार्ग द्यावा किंवा उड्डाणपुलाची व्यवस्था करावी, अशी ग्रामस्थांची ठाम मागणी आहे. जर प्रशासनाने या मागणीची दखल न घेता लोकांचे जीवन धोक्यात टाकले, तर हा संघर्ष अधिक तीव्र करण्याचा इशारा तळेगावकरांनी दिला आहे.